# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

## क्र. मुमाआ/नों. क्र. १६९८/१९/अ.क्र. १४७/२२/०१

**Shri. Pannalal Hiralal Gupta**
Shop No. 361/1, Jai Bajarang Kirana Stores,
Pipeline Behind Thakkar Petrol Pump,
Bhim Nagar, LBS Marg, Ghatkopar (W)
Mumbai – 400086.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एन विभाग**
एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
एन विभाग यांचे कार्यालय, १ला मजला, जवाहार मार्ग,
घाटकोपर (पु.), मुंबई ४०० ०७७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एन विभाग**
एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
एन विभाग यांचे कार्यालय, १ला मजला, जवाहार मार्ग,
घाटकोपर (पु.), मुंबई ४०० ०७७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०२.२०२२**

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.११.२०१८ | १३.११.२०१८ | १२.१२.२०१८ | २८.१२.२०१८ |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. ०५.११.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. संदर अर्जान्वये त्यांनी, CTS No. १९०(PT) Septic Tank Ghatkoper Gurukrupa SRA CHS ltd., Ghatkoper (E), Mumbai-४०००७५ बाबतची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

AARTI

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. २६.०३.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.११.२०१८ रोजी असे उत्तर देण्यात आले की, आपल्या अर्जात नमूद केलेली माहिती उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) घाटकोपर कार्यालय यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला माहिती अर्ज या कार्यालयाकडे हस्तांतरण करण्यात आला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.१२.२०१८ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी संयुक्तिक असून अर्जदाराने सदर माहितीकरिता उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) घाटकोपर यांच्याकडे पाठपुरावा करणे अभिप्रेत आहे असे नमूद करुन अपिल निकाली काढले.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एन विभाग, श्री. दिगंबर डगरे उपस्थित असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

कागदपत्राचे अवलोकन करुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाकडे असू शकतील.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १७.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**मुंबई**
**दिनांक : १४.०२.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**प्रत:** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, सहकार कक्ष, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई ४०० ०५१ विभागाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहावे.

AARTI